**<u>ठळक बातम्या</u>**

- पाकिस्तानात दहशतवादी लपून राहू शकतील अशी जागा उरली नसल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन, हवाईदल जवानांशी साधला संवाद

- महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाच्या इयत्ता १०वीच्या परीक्षेत ९४ पूर्णांक १ दशांश टक्के विद्यार्थी उत्तीर्ण /केंद्रीय शिक्षण मंडळाचे दहावी-बारावीचे निकालही जाहीर

- पंजाबमध्ये विषारी दारूमुळे मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या २१ वर

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे १ हजार २८२ अंकाची घसरण

- आयपीएल क्रिकेट सामने येत्या शनिवारपासून पुन्हा सुरु होणार

**आणि**

- नैर्ऋत्य मोसमी पाऊस दक्षिण अंदमान समुद्रात दाखल

**<><><><><>**

दहशतवाद्यांना त्यांच्या घरात घुसून टिपण्याचं सामर्थ्य भारताकडे असून पाकिस्तानात दहशतवादी लपून राहू शकतील, अशी जागा आता उरली नसल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. पंजाबमधे आदमपूर इथं हवाईदलाच्या तळावर ते आज सैनिकांशी संवाद साधत होते. ऑपरेशन सिंदूर मधे सेनादलांनी बजावलेल्या कामगिरीचा, सैनिकांच्या शौर्य, धैर्य आणि युद्धकौशल्याचा त्यांनी गौरव केला. ऑपरेशन सिंदूर मुळे देशभरात अभिमान आणि एकीची भावना अधिक बळकट झाली, तसंच दहशतवादाला आश्रय देणाऱ्यांना धडा मिळाला असल्याचं ते म्हणाले.....

**होल्ड- बाईट- प्रधानमंत्री ( २४ सेकंद)**

<><><><><>

'ऑपरेशन सिंदूर' बाबत जनजागृतीच्या उद्देशानं भारतीय जनता पक्षानं आजपासून देशभरात जनजागृती मोहिम हाती घेतली आहे. या मोहिमेला त्यांनी 'तिरंगा यात्रा' असं नाव दिलं असून पाकिस्तानविरोधात भारतीय लष्करानं केलेल्या यशस्वी कारवायांवर प्रकाश टाकला जाणार आहे. राजधानी दिल्लीतल्या कर्तव्यपथावर आज संध्याकाळी विशेष कार्यक्रमाचे आयोजन केलं आहे.

<><><><><>

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात घेतलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा म्हणजेच इयत्ता दहावीचा निकाल आज जाहीर झाला. त्यात ९४ पूर्णांक १० शतांश टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

यंदाही कोकण विभागाचा निकाल सर्वाधिक, ९८ पूर्णांक ८२ शतांश टक्के इतका आहे. तर सर्वात कमी निकाल हा नागपूर विभागाचा लागला आहे.

विभागनिहाय टक्केवारीत **पुणे विभाग** -९४ पूर्णांक ८१ शतांश, **नागपूर** - ९० पूर्णांक ७८ शतांश, **छत्रपती संभाजीनगर** ९२ पूर्णांक ८२ शतांश, **मुंबई** ९५ पूर्णांक ८४ शतांश, **कोल्हापूर** - ९६ पूर्णांक ७८ शतांश, **अमरावती** - ९२ पूर्णांक ९५ शतांश, **नाशिक** - ९३ पूर्णांक ०४ शतांश, आणि **लातूर** - ९२ पूर्णांक ७७ शतांश टक्के.

केंद्रीय शिक्षण मंडळाच्या १० वी १२ वी च्या परीक्षेचा निकालही जाहीर झाला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अभिनंदन केलं आहे.

<><><><><>

पंजाबमध्ये विषारी दारूमुळे मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या २१ झाली आहे. अमृतसरच्या मजीठा भागातल्या चार गावातल्या नागरिकांनी काल रात्री इथेनॉल मिश्रीत दारू प्यायली होती. याप्रकरणी दहा जणांना अटक केलं असून दोन

उत्पादन शुल्क अधिकारी, एक पोलिस उपअधिक्षक आणि एका पोलिस अधिकाऱ्याला निलंबित केलं आहे.

या घटनेत मरण पावलेल्यांच्या कुटुंबियांची मुख्यमंत्री भगवंत सिंह मान यांनी भेट घेत दोषींची गय केली जाणार नाही, असं आश्वासन दिलं. प्रत्येक मृताच्या कुटुंबाला प्रत्येकी १० लाख रुपये सानुग्रह अनुदान आणि कुटुंबातील एका सदस्याला नोकरी देण्याचं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिलं आहे.

<><><><>

नैसर्गिक वाळूच्या अतिउपशामुळे निर्माण होणाऱ्या पर्यावरणीय संकटांना आळा बसावा, तसंच बांधकाम क्षेत्राला पर्यायी आणि टिकाऊ साधन उपलब्ध व्हावं यासाठी राज्यात कृत्रिम वाळूचं उत्पादन आणि वापर धोरणाला राज्य मंत्रिमंडळानं आज मंजुरी दिली.

शासकीय कर्मचारी आणि अधिकाऱ्यांच्या वेतनातल्या त्रुटी दूर करण्यासाठी स्थापन केलेल्या मुकेश खुल्लर समितीचा अहवाल मंत्रिमंडळानं आजच्या बैठकीत स्वीकारला.

रस्त्यावर राहणाऱ्या बालकांच्या पुनर्वसनासाठी राज्यात फिरतं पथक योजनेलाही राज्य मंत्रिमंडळानं हिरवा कंदील दाखवला.

<><><><>

भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना आज निवृत्त झाले. १० नोव्हेंबर २०२४ रोजी त्यांनी पदभार स्वीकारला होता. निवृत्तीनंतर आपण कोणतंही लाभाचं पद स्वीकारणार नाही असं खन्ना यांनी स्पष्ट केलं असून कायद्याच्या क्षेत्रात कार्यरत राहण्याचा मनोदय व्यक्त केला आहे.

भारताचे नवे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती भूषण गवई यांचा उद्या शपथविधी होणार आहे. राष्ट्रपती भवनात आयोजित विशेष कार्यक्रमात राष्ट्रपती

द्रौपदी मुर्मू त्यांना पद आणि गोपनियतेची शपथ देतील. न्यायमूर्ती गवई भारताचे ५२ वे सरन्यायाधीश असतील.

**<><><><>**

मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स आज १ हजार २८२ अंकाची म्हणजेच सुमारे दीड टक्के घसरण नोंदवत ८१ हजार १४८ अंकावर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ३४६ अंकांनी घसरून २४ हजार ५७८ अंकावर बंद झाला.

मुंबई शेअर बाजारात आज २ हजार ५५९ कंपन्यांचे शेअर्स वधारले. १ हजार ४०२ कंपन्यांचे शेअर्स घसरले, तर १४० कंपन्यांचे शेअर्स स्थिर राहिले.

**<><><><>**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं आयपीएल स्पर्धेचं सुधारित वेळापत्रक जाहीर केलं आहे. या वेळापत्रकानुसार येत्या शनिवारी म्हणजे १७ मे पासून पुन्हा सामने सुरु होणार आहेत. या दिवशी रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू आणि कोलकता नाईट रायडर्स यांच्यात बेंगळुरू इथं सामना होईल. तर ८ मे रोजी धरमशाला इथं पंजाब किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्स संघांमध्ये अर्ध्यावर सोडलेला सामना आता २४ मे रोजी जयपूरला होणार आहे.

**<><><><>**

सातव्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्रानं ९४ पदकांसह पदकतालिकेत अव्वल स्थान कायम राखलं आहे. यात ३६ सुवर्ण, ३० रौप्य आणि २८ कांस्यपदकांचा समावेश आहे.

आज जिमनॅस्टिक्समधे महाराष्ट्राच्या परिना हिनं सुवर्णपदक, तर देवांगी पवारनं कांस्य पदक पटकावलं. बॉल जिमनॅस्टिक्स स्पर्धेत किमया कारळेनं सुवर्ण पदक, तर परिनानं रौप्य पदक पटकावलं.

**<><><><>**

नैर्ऋत्य मोसमी पावसानं बंगालच्या उपसागरातला दक्षिण भाग व्यापला असून दक्षिण अंदमान समुद्र, निकोबार बेटं आणि उत्तर अंदमान सुद्राच्या काही भागात तो पोहोचला आहे. पुढच्या  ३-४ दिवसात मान्सून आणखी पुढं सरकेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**<><><><><>**

देशाच्या प्रगतीला चालना देण्यासाठी देशातलं ऊर्जाक्षेत्र आधुनिक, आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि भविष्याच्या दृष्टीनं सज्ज असायला हवं, असं मत केंद्रीय ऊर्जामंत्री मनोहर लाल यांनी आज मांडलं. ते आज मुंबईत पश्चिम विभागातल्या राज्यांच्या स्थानिक ऊर्जा परिषदेत बोलत होते. २०४७पर्यंत विकसित भारताचं उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार यांच्यात समन्वय आणि सहकार्य असणं गरजेचं असल्याचं ते म्हणाले.

ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक, गोव्याचे ऊर्जामंत्री रामकृष्ण ढवळीकर, गुजरातचे ऊर्जामंत्री कनूभाई देसाई यांच्यासह इतर राज्यांचे मंत्री, तसंच संबंधित खात्यांचे वरिष्ठ अधिकारी या परिषदेला उपस्थित होते.

**-<><><><><>**

जम्मू काश्मीरमधल्या शोपियान जिल्ह्यातल्या शुकरू केल्लर वन विभागात संरक्षण दल आणि दहशतवादी यांच्यात आज सकाळी झालेल्या चकमकीत तीन दहशतवादी ठार झाले. हे दहशतवादी लष्कर ए तैयबा किंवा द रेझिस्टन्स फ्रंट चे सदस्य असल्याची शक्यता काश्मीर पोलीसांनी वर्तवली आहे.

दरम्यान जम्मू काश्मीर, राजस्थान आणि पंजाबमधल्या सीमावर्ती भागात परिस्थिती शांत असून जनजीवन पूर्वपदावर येत आहे. आज या भागातल्या शाळा सुरु झाल्या.

**<><><><><>**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी आज नवी दिल्ली इथं झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत देशाच्या पश्चिम सीमेच्या सुरक्षा परिस्थितीचा आढावा घेतला. या बैठकीला संरक्षण प्रमुख जनरल अनिल चौहान, नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश के त्रिपाठी, लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी आणि हवाई दलाचे उपप्रमुख एअर मार्शल नर्मदेश्वर तिवारी तसंच संरक्षण सचिव राजेश कुमार सिंग हे उपस्थित होते.

<><><><><>

गेल्या महिन्यात ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित चलनफुगवट्याचा दर ३ पूर्णांक १६ शतांश टक्क्यावर उतरला. मार्चमधे तो ३ पूर्णांक ३४ शतांश टक्के होता. भाज्या, कडधान्य, फळं, मांस, मासे, तसंच वैयक्तिक वापराच्या वस्तूंचे दर कमी झाल्यानं भाववाढीला आळा बसला. अन्नधान्य किंमत निर्देशांकात घट होऊन तो २ पूर्णांक ६२ टक्क्यावरुन १ पूर्णांक ७८ शतांश टक्क्यावर आला.

//<><><><><>//